**नियमित दिवाणी कब्जा क्र. १३७/२०२१ मधील नि.क्र. ५८ वरील आदेश**

( पारीत दिनांक – ०६/०१/२०२६)

सुनिता शिवाजी ढोणुक्षे वि. शिवाजी ईश्वरा ढोणुक्षे

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश १ नियम १० अन्वये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीच्या कथनानुसार, सदरचा दावा वादीने प्रतिवादी यांचे विरुध्द वाटपाकरीता व कायम मनाई करीता दाखल केला असून दावा वाटपाकरीता असलेने दाव्याच्या कामी सर्व आवश्यक पक्षकार सामील करणे आवश्यक आहे. प्रतिवादी यांनी त्यांचे कैफियतीमध्ये प्रतिवादी क्र. १ यांचे बहिणींना सामील न केलेमुळे दावा चालणेस पात्र नाही असा बचाव घेतला असून प्रतिवादी क्र. ८ व ९ यांना सामील करणेस परवानगी मिळण्याकरीता सदरचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

३. सदरील अर्जास प्रतिवादी क्र. १ व २ यांनी अर्जाच्या मागील बाजूस त्यांचे म्हणणे दाखल केले असून सदर कामी प्रतिवादी क्र. ८ ते १० यांना दावा दाखल करतानाच पक्षकार करणे आवश्यक व न्यायाचे होते. वादीने मुद्दामहून त्यांना पक्षकार केलेले नव्हते. सबब, सदरचा अर्ज मंजूर करावयाचा झालेस हेवी कॉस्ट करण्याची विनंती प्रतिवादीने केलेली आहे.

४. वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र. ३ ते ७ यांना वारंवार पुरेशी संधी देवूनही त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल न केल्याने प्रस्तुतचा अर्ज त्यांचे म्हणणेविना पुढे चालविण्यात येतो. तसेच प्रतिवादी क्र. ३ ते ७ हे तसेच त्यांचेतर्फे विधिज्ञ युक्तीवादासाठी हजर राहिले नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ ते ७ यांच्या युक्तीवादाविना पुढे चालविण्यात येतो. प्रस्तुत अर्जातील प्रस्तावित प्रतिवादी क्र. ८ व ९ यांना प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने नोटीस बजावणी होवून देखील वारंवार पुरेशी संधी देवूनही ते प्रस्तुत प्रकरणात हजर झाले नाहीत व त्यांचे म्हणणे सादर केले नाही. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज सदर प्रस्तावित प्रतिवादींच्या म्हणणेविना पुढे चालविण्यात येतो.

५. प्रस्तुत प्रकरणी दावा हा वाटपाकरीता व कायम मनाईकरीता दाखल

केलेला आहे. वादी यांनी प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ८ व ९ यांना सामील करणेस परवानगी मागितली आहे. दाव्याचा तसेच अर्जातील नमुद कारणांचा विचार करता सदरचा दावा गुणदोषावर निकाली करण्यासाठी प्रस्तावित प्रतिवादी हे आवश्यक पक्षकार आहेत. अर्जातील नमुद कारणांचा विचार करता तसेच दाव्याच्या स्वरुपाचा विचार करता सदरचा अर्ज मंजूर करणे योग्य राहील असे वाटते. सबब, सदरचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहेः–

**– आ दे श –**

१) अर्ज (निशाणी क्र.५८) वादी यांनी प्रतिवादी यांना रक्कम रु. ५००/– खर्च (cost) स्वरुपात देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२) वादीनी प्रस्तावित दुरुस्ती वादपत्रामध्ये करुन त्याप्रमाणे सुधारीत प्रत त्वरित अभिलेखावरती दाखल करावी.

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.01.08 13:16:00 +0900

कागल. **(प्रणिता एस.पाटील)**

दिनांक – ०६/०१/२०२६ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.